## B.A. Part—II Semester—III Examination

## (Compulsory Language)

## MARATHI

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

**सूचना :**—बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतानां ग्रहीत धरल्या जातील.

1. 'कोमलतेसह येणारे ज्ञान सदैव संस्मरणीय ठरते' हे आ. ह. साळुंखे यांच्या' मीपण स्वत्वाच्या सीमेत दरवळतं, तो पर्यंतच ते सुगंधी असतं !' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

'मराठी भाषेत शब्दांचा भरणा व्हावयास हवा असेल तर निरनिराळ्या पेशांतील धंद्यातील रूपके भाषेत प्रविष्ट व्हावयास हवी.' या श्री. मा. माटे यांच्या विधानाचा परामर्श घ्या. 16

2. 'आज्ञापत्र' या पाठाच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पर्यावरणविषयक दूरदृष्टींचा आढावा घ्या.

**किंवा**

'दिवस असे होते' या पाठातून द्या पवार यांच्या हायस्कूल मधील स्वानुभवांना तुमच्या शब्दात स्पष्ट करा. 16

3. (अ) संत चोखामेळा यांच्या 'उस डोंगा परी रस नव्हे डोंगा' या अभंगाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा.

**किंवा**

'धावपळीच्या जीवनात शांतता कशी भंग होते आहे.' हे कवी सिद्धार्थ भगत यांच्या 'शांतता' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा. 8

(ब) बदलत्या संस्कृतीची जाणीव 'जातं' या कवितेतून कशी व्यक्त झाली आहे. चर्चा करा.

**किंवा**

समाजातील दांभिकतेवर 'अखेर कमाई' या कवितेतून कुसुमाग्रजांनी कसा प्रहार केला ? ते सोदाहरण स्पष्ट करा. 8

4. (अ) वक्तृत्त्व कलेचे महत्त्व स्पष्ट करून वक्तृत्त्व कलेच्या विविध पैलुंचा आढावा घ्या.

**किंवा**

वक्तृत्त्व म्हणजे काय ? ते सांगून प्रभावी वक्ता होण्याकरिता वक्त्याला कोण-कोणते गुण आवश्यक आहेत ? स्पष्ट करा. 8

(ब) सूत्रसंचालन करतांना सूत्रसंचालनाची पूर्वतयारी व प्रसंगावधान कसे महत्त्वाचे आहे ? ते सुधीर गाडगीळ यांच्या 'सूत्रसंचालन' या लेखाच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

'सूत्र संचालन ही एक कला आहे' या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या. 8

5. खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा :

(1) 'शुद्ध चरित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी' या पाठाचे लेखक कोण ?

(अ) लक्ष्मणशास्त्री जोशी (ब) पु. ल. देशपांडे

(क) नारायण सुर्वे. (ड) दया पवार

(2) '1942 च्या' भारत छोड़ो' या अखेरच्या आंदोलनात यशवंतरावांनी __________ जिल्ह्याचे नेतृत्व केले.

(अ) कोल्हापूर (ब) सातारा

(क) सांगली (ड) पुणे

(3) 'आप्त' या शब्दाला आ. हा. साळुंखे यांनी कोणता पर्यायी शब्द सूचविला ?

(अ) यथार्थवक्ता (ब) उत्तम वक्ता

(क) ज्ञानी वक्ता (ड) सूज्ञ वक्ता

(4) फुशारकीचे वर्णन करतांना 'मी त्या हेलक-याला तसेच पुढे ____________ नेले.

(अ) ओढीत (ब) ताणीत

(क) फरफटत (ड) उचलून

(5) आज्ञापत्रातून छत्रपती शिवाजी महाराजांची ____________ विषयक दूरदृष्टी दिसून येते.

(अ) आरोग्य (ब) पर्यावरण

(क) वातावरण (ड) आवरण

(6) 'चिमनरावाचे चऱ्हाट' या विनोदी पुस्तकाचे लेखक कोण ?

(अ) पु. ल. देशपांडे (ब) रा. ग. जाधव

(क) बा. सि मर्ढेकर (ड) चि. वि. जोशी

(7) 'दिवस असे होते' हा लेख दया पवार यांच्या ____________ आत्मकथनातून घेतला आहे.

(अ) बलुतं (ब) कोल्हाट्याचं पोरं

(क) आठवणीचे पक्षी (ड) उपरा

(8) दया पवार यांना नाटकाचे वेड असल्यामुळे लहानपणी त्यांना काय व्हावेसे वाटायचे ?

(अ) नाटककार (ब) अभिनेता

(क) तमासगीर (ड) गायक

(9) 'उस डोंगा परी रस नव्हे डोंगा। काय भुललासी ___________ ?

(अ) वरलीया रंगा (ब) बाह्यय रंगा

(क) अंतरंगा (ड) आत्मरंगा

(10) संत सोयरबाई आपल्या अभंगातून कोणाची कानउघाडणी करतात ?

(अ) धर्मांधांची (ब) पाखंडींची

(क) कर्मठांची (ड) सुधारकांची

(11) 'अखेर कमाई' कवितेत कवी कुसुमाग्रजांनी समाजातील कोणत्या प्रवृत्तीवर कोरडे ओढले ?

(अ) धार्मिक (ब) सांस्कृतिक

(क) दांभिक (ड) वाईट

(12) 'हकिकत व जटायू' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(अ) केशव मेश्राम (ब) उत्तम तुपे

(क) अशोक पवार (ड) सागर जाधव

(13) 'वाटलं, आतातरी थोडं मांस चढंल तुझ्या ___________ हाडावर'.

(अ) जीर्ण (ब) तुटलेल्या

(क) करपलेल्या (ड) मोडलेल्या

(14) 'सात-बाराची नोंद' या कवितेचे कवी कोण ?

(अ) लक्ष्मण माने (ब) लक्ष्मण महाडिक

(क) लक्ष्मण देशपांडे (ड) लक्ष्मण जाधव

(15) 'शांतता' ही कविता कोणत्या काव्य प्रकारात मोडते ?

(अ) गझल (ब) भावगीत

(क) भक्ती गीत (ड) अभंग

(16) शुद्ध चारित्र्याचा प्रज्ञावंत राजकारणी असे लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कोणास उद्देशुन म्हटले आहे ?

(अ) शंकरराव चव्हाण (ब) वसंतदादा पाटील

(क) शरद पवार (ड) यशवंतराव चव्हाण 16×1=16

139 139 139 139 139